लघु उद्योगाची अस्थायी नोंदणी

अकृषिक परवानगी बाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय, क्रमांक अनअपी-१०८९/२२६७२९-[६]-ल-२.
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक:- २८ जानेवारी १९९१

प्राक्कथन:-

अस्थाई लघु उद्योग नोंदणी ही कुठल्याही उद्योगासाठी अगदी प्रारंभिक कार्यवा आहे व त्या दृष्टीने ती मोठ्या उद्योगाचे बाबतीत देण्यात येणा-या इरादापत्राच्या [लिटर ऑफ इंटेन्ट] समतुल्य आहे. अस्थाई नोंदणी ही उद्योजकाना पुढील सर्व कायदेशिर परवाने व मंजु-या मिळविण्यासाठी उपयुक्त ठरते. ज्या लघु उद्योगाला अस्थायी नोंदणी याचा अर्थ त्या लघु उद्योगाला इतर खात्याच्या कायदेशिर परवाने/मंजु-या मिळाल्या कि मिळतीलच असे नव्हे. त्यासाठी त्या त्या अनुषंगाने स्वतंत्र कार्यवाही करावी लागेल. लघु उद्योजकांच्या अस्थायी नोंदणी संबंधी ही भूमीका एकदा मान्य केल्यानंतर औद्योगिक बिन परवानगी घेण्यापुर्वी देखील अस्थायी लघु उद्योग नोंदणी देण्यास हरकत नसावी. तथापि, स्थायी नोंदणीच्या वेळी इतर सर्व आवश्यक परवानगी प्रमाणपत्रासोबत बिनशेती परवानगी मिळाल्याची खात्री करुन घेता येईल.

२. उपरोक्त, प्रस्तावनेतील भूमिकेच्या संदर्भात लोक प्रतिनिधीनी लघु उद्योगांना अस्थायी नोंदणी देताना अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही असा आग्रह धरला. म्हणून लघु उद्योग धंदाना अस्थायी नोंदणी देताना अकृषिक परवानगीची आवश्यकता आहे किंवा कसे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. विचारांती शासनाने पुढील परिच्छेद ३ मध्ये दिल्याप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

३. निर्णय:- प्रथम अकृषिक परवानगी न मिळविता लघु उद्योगधारकांना अस्थायी नोंदणी देण्यास हरकत नाही. तथापि अशा अस्थायी धंदांना स्थायी नोंदणी देण्यापुर्वी अकृषिक परवानगी मिळवून ती नोंदणी अधिका-यांना सादर करण्याची आवश्यकता राहील. तसेच वित्तीय संस्थानी देखील अकृषिक परवानगी मिळण्या अगोदर अशा संस्थाना वित्त पुरवठा करु नये.

४. हा शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

[ ग. ह. पाटील. ]
शासनाचे अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रती
उद्योग संचालक, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२

-९०-

बी. ९८७३
नं. क्र. ९

परिपत्रक क्र. १४ /९१.
सर्वसाधारण

क्र. लउ. उ. धो/संकीर्ण-३४/नोंदणी/गावठाण एरिया/८
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २७-२-१९९१ MAR 1991

प्रति,

१] महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र [सर्व]

२] उद्योग सह संचालक
मुंबई प्राधिकरण विभाग,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

३] तांत्रिक सल्लागार
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
अंधेरी, मुंबई - ४०० ०९३.

४] नियंत्रक,
उद्योग मित्र,
निर्मल, नरिमन पॉईंट,
मुंबई.

विषय:- लघु उद्योग नोंदणीसाठी उद्योगाची जागा अकृषिक असण्याबाबत.

संदर्भ :- परिपत्रक क्र. ११/८९, दि. ३. २. १९८९
[क्र. ल. उ. धो/संकीर्ण-३५/नोंदणी गावठाण/एरिया/८९/बी-४४३०]

प्राक्कथन

गावठाण क्षेत्रात, विजेवर चालणाऱ्या यंत्रसामुग्रीचा वापर करुन औद्योगिक उत्पादन/प्रकीया करणाऱ्या लघु उद्योगांच्या बाबतीत, महाराष्ट्र महसूल अधिनियमानुसार उद्योगाची जागा औद्योगिक प्रयोजनासाठी अकृषिक झाली असली पाहिजे, या महसूल व वन विभागाच्या अभिप्रायानुसार गावठाण हद्दीत लघु उद्योग नोंदणीसाठी अकृषिक परवानगी आवश्यक आहे, आणि उद्योजकाने औद्योगिक प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी घेतल्याशिवाय त्याना लघु उद्योग नोंदणी देण्यात येऊ नये अशा सूचना सर्व लघु उद्योग नोंदणी अधिकाऱ्यांना परिपत्रक क्र. ११/८९ दि. ३. २. १९८९ नुसार देण्यात आलेल्या होत्या.

कृपया. पहा..

२] गावठाण क्षेत्रात अकृषिक परवानगी मिळण्याच्या कामी अडचणी येतात तसेच यासाठी विलंब होतो म्हणून अस्थायी लघु उद्योग नोंदणीच्या वेळी ही अट शिथिल करावी अशा अर्थाची अनेक निवेदने उद्योजक, उद्योजकांच्या संघटना, लोकप्रतिनिधी, इत्यादी यांच्याकडून शासनास प्राप्त झाली होती. अस्थायी लघु उद्योग नोंदणी देताना अकृषिक परवानगीची आवश्यकता आहे किंवा कसे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. विचाराअंती शासनाने निर्णय क्र. अेन. अे. पी. -१०८९/२२७२९-[६]-ल-२, महसूल व वन विभाग खाली परिच्छेद क्र. ३ मध्ये दिल्याप्रमाणे निर्णय घेतलेला आहे [सोबत निर्णयाची प्रत जोडली आहे]

३] निर्णय:- प्रथम अकृषिक परवानगी न मिळविता लघु उद्योग धारकाना अस्थायी नोंदणी देण्यास हरकत नाही. तथापि अशा अस्थायी लघु उद्योग धंदयाना स्थायी नोंदणी देण्यापूर्वी *ती नोंदणी अधिका-यांना सादर करणे आवश्यक राहिल. तसेच वित्तिय संस्थानी देखील अकृषिक परवानगी मिळण्या अगोदर अशा संस्थाना वित्त पुरवठा करु नये. *अकृषिक परवानगी मिळवून

४] सदर शासन निर्णय लक्षात घेता परिपत्रक क्र. ११/८९, दिनांक ३.२.८९ आता मागे घेण्यात आले असून त्यानुसार देण्यात आलेल्या सूचना रद्द करण्यांत येत आहेत. याबाबतीत आता खालील प्रमाणे सुधारित सुचना देण्यात येत आहेत.

सुधारित सूचना :-

[१] या पूढे अस्थायी नोंदणीसाठी अकृषिक परवानगीचा आग्रह न धरता अस्थायी लघु उद्योग नोंदणी उद्योजकाना देण्यात यावी मात्र अस्थायी नोंदणी प्रमाणपत्रात खालील प्रमाणे अट नमुद करुन मगच नोंदणीपत्र देण्यांत यावे.

अट : जो पर्यन्त घटक औद्योगिक प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी प्राप्त करुन सादर करित नाही तोपर्यन्त वित्तीय संस्थानी घटकास वित्त पुरवठा करु नये.

या अटीमुळे वित्तीय संस्थाना घटकांच्या अर्थ सहाय्यासाठीच्या अर्जावर कार्यवाही करण्यामध्ये बाधा येणार नाही. मात्र वित्तिय संस्थांनी अकृषिक परवानगी प्राप्त झाल्याशिवाय घटकांना अर्थ सहाय्य वितरीत करु नये.

[२] जे उद्योजक अस्थायी नोंदणीच्या वेळी उद्योगाची जागा औद्योगिक प्रयोजनासाठी अकृषिक आहे, याबाबत पुरावा सादर करतील, त्या प्रकरणात अस्थायी नोंदणी देताना वरील प्रमाणे अट नमूद करण्याची आवश्यकता नाही.

[३] स्थायी लघु उद्योग नोंदणीसाठी औद्योगिक प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी आवश्यक असून अशी परवानगी घटकाने प्राप्त केली आहे याची खात्री झाल्यानंतर व याबाबत कागदोपत्री पुरावा नस्तीवर अभिलेखासाठी ठेवल्यानंतरच घटकाच्या अस्थायी नोंदणीचे रुपांतर स्थायी नोंदणीमध्ये करावे.

[४] वरील सूचना गावठाण तसेच इतर क्षेत्रामध्ये येणाऱ्या लघु उद्योगांच्या बाबतीत लागू आहेत व त्याचे काटेखोरपणे पालन करावे.

[ चिं. शा. संगितराव ]
उद्योग सह संचालक [ल. उ. धो.]

विकास आयुक्त [उद्योग]
यांच्या मान्यतेने.

प्रत माहितीसाठी :-

[१] विकास आयुक्त [उद्योग] यांचे स्वीय सहाय्यक.

[२] अतिरिक्त उद्योग आयुक्त.

[३] अतिरिक्त उद्योग संचालक.

[४] सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग [उ-१८ कक्ष], मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

[५] सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

प्रत माहितीकरिता व योग्य त्या कार्यवाहीकरता.

[१] उद्योग सह संचालक/अधिक्षकीय उद्योग अधिकारी, विभागिय कार्यालय, मुंबई / पुणे/नाशिक/नागपूर/ औरंगाबाद/अमरावती.

[२] जिल्हाअधिकारी, जिल्हा ______________ [सर्व].

प्रत माहिती करता.:

[१] मुख्य कार्यालयातील सर्व शाखा.

[२] कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, न्यु एक्सेलसिअर सिनेमा बिल्डींग, फोर्ट, मुंबई - १.

मुहआ/-२१११.